# नमुना-(अ)

**महाराष्ट्र जमीन महसुल (जन जातीयाकडून जनजातीएतराकडे भोगाधीकार हस्तांतरीत करणे) नियम १९७५ याच्या नियम (३) अन्वये द्यावयाची जाहीर नोटीस.**

**ज्या अर्थी** महाराष्ट्र शासनास व मा.अप्पर जिल्हाधिकारी जळगांव यांच्याकडे या खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या (१) एकुक गुंताबाई शिवाजी भिल, (२) नबाबाई भ्र रामजी भिल, (३) जितेन्द्र गोपीचंद भिल व इतर-५ सर्व राहणार वंजारी खु. ता. पारोळा, जि.जळगांव यांचे (ज.मु.) या आदिवासी खातेदारांच्या मालकीच्या मौजे वंजारी खु. शिवारातील ग्रामपंचायत हद्दीतील ता. पारोळा जि. जळगांव येथील (१) गट नं. १०६/३ चे क्षेत्र ०१ हेक्टर ६२ आर, आकार (२.५०) पैसे, (२) गट नं. १०६/४ चे क्षेत्र ०१ हेक्टर ६२ आर, आकार (२.५०) पैसे व (३) गट नं. १०६/५ चे क्षेत्र ०१ हेक्टर ३३ आर, आकार (२.०५) पैसे असे एकूण संपूर्ण क्षेत्र (०४ हेक्टर ५७ आर) या तीनही आदिवासी शेतजमीनी बिगर आदिवासी खातेदार श्री. सुरेश वना चौधरी व श्री. कैलास आनंदा चौधरी यांच्या मालकीच्या मौजे म्हसवे शिवारातील ग्रामपंचायत हद्दीतील ता. पारोळा जि. जळगांव येथील गट नं. १०१ चे संपूर्ण क्षेत्र ०३ हेक्टर ४६ आर आकार (३.७०) पैसे या विहीर पाण्याच्या बागायत शेतजमीनीशी आपआपसात विनामोबदला अदलाबदलीने हस्तांतरण करण्यास परवानगी मिळणेसाठी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ३६ व ३६(अ) तसेच महाराष्ट्र जमीन महसुल (जन जातीयाकडून जनजातीएतराकडे भोगाधीकार हस्तांतरीत करणे) नियम १९७५ चा **नियम(४)(१)(डी)(२)** मधील परिच्छेद (८२) अन्वये परवानगी मिळणेबाबतचा विनंती अर्ज सादर केलेला आहे.

**आणि ज्याअर्थी** मौजे वंजारी खु. व मौजे म्हसवे ता. पारोळा जि. जळगांव या गावामध्ये अथवा त्यापासून ५ कि.मी. अंतराच्या परिसरात राहणारी एखादी जनजातीय व्यक्ती कायमची रहिवासी असुन तेथेच रहात आहे. आणि त्यांना (१) एकुक गुंताबाई शिवाजी भिल, (२) नबाबाई भ्र रामजी भिल, (३) जितेन्द्र गोपीचंद भिल व इतर-५ यांच्याकडून वरील वर्णन केलेल्या शतेजमिनी अदलाबदलीने अथवा विक्रीने भोगाधिकार स्विकारण्याची तयारी आहे. असा अन्य कोणी आदिवासी खातेदार यांना शेतजमीन अदलाबदलीने किंवा विक्री हस्तांतरणाने विकत घेण्याची /करणेची इच्छा असेल त्यांनी या नोटीसीच्या दिनांकापासून एक (०१) महीन्याच्या आत खालील सही करणाऱ्याकडे अर्ज सविस्तर माहिती व पुरावासह सादर करण्याचे याव्दारे आव्हान करण्यात येत आहे.

**तहसिलदार, पारोळा**